## – नि.क्र. १ वरील आदेश–

(दिनांक १०/०७/२०२६)

सदरचा अर्ज हा अर्जदार यांनी नि.दि.दा.क्र.६९/२००८ (जुना नि.दि.दावा क्र. ०७/२००७) पुन्हा फैलावर घेण्यासाठी दाखल करण्याकरीता झालेला विलंब क्षमापित करण्याकरीता सादर केला आहे.

सदरकामी अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की,

२. अर्जदार यांनी गट क्र. ११ एकुण क्षे. १ हे. ६३ आर या मौजे पांगरी खुर्द, ता. मंठा, जि. जालना या मिळकतीबाबत कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता नि.दि.दा.क्र. ६९/२००८ (जुना नि.दि.दावा क्र. ०७/२००७) न्यायालयात दाखल केला होता. सदरील मिळकत अर्जदाराच्या ताब्यात होती व आहे. कालांतराने सदरील दाव्यात मा. न्यायालयाने दिनांक २१/०८/२००८ रोजी पारित केलेल्या आदेशाच्याविरुध्द अर्जदाराने मा. उच्च् न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका .क्र. ६८०१/२००८ दाखल केली होती. सदरील रिट याचीका अदयापही प्रलंबीत आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्थगीती आदेश पारित केला होता व आहे. असे असतांना देखील मा.दिवाणी न्यायालय क.स्तर मंठा यांनी दिनांक २८/०४/२०११ रोजी सदरचा दावा खारीज केला. याबाबत अर्जदाराला त्यास दि.दा.क्र. ७०/२०२४ मध्ये नोटीस प्राप्त झाल्यानंतर कळाले. त्यामुळे लागलीच त्यांनी प्रस्तुतचा अर्ज सदरचा दावा फैलावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होण्याबाबत दाखल केलेला आहे. सदरचा विलंब हा जाणीवपुर्वक किंवा हेतुपुरस्सर झालेला नाही. त्यामुळे तो क्षमापित करण्याची विंनती अर्जदार याने केली आहे.

३. सदरच्या अर्जावर गैरअर्जदार यांनी नि.क्र.१२ प्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यामध्ये त्यांनी अर्जातील मजकुर स्पषटपणे नाकारला आणि असे सादर केले की, झालेल्या विलंबाबाबत अर्जदाराने कोणतेही ठोस असे कारण दिलेले नाही. सदरचा विलंब हा अर्जदाराने जाणीवपुर्वक केल्याचा त्यांचा आक्षेप आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कम्पेनसेटरी कॉस्ट लादुन

फेटाळण्यात यावा असे त्यांचे कथन आहे.

**५.** अर्जदारातर्फे विधिज्ञ श्रीमती. के.व्ही. प्रधान व गैरअर्जदार हयांचेतर्फे विधिज्ञ श्री.ओ. एस. राउत हयांचा युक्तिवाद ऐकला.

**६.** अर्जदाराने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ नि.दि.दा.क्र. ६९/२००८ यातील दिनांक २८/०४/२०११ रोजीच्या आदेशाची प्रमाणीत नक्कल, त्याचप्रमाणे सदरील दाव्यामध्ये नि.क्र.२३ ला कोर्ट कमीशनर नेमण्याबाबतच्या अर्जावरील दिनांक २१/०८/२००८ रोजीच्या आदेशाची प्रत, असे दस्त दाखल केले आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या दि.२५/११/२००८, १९/०१/२००९ व ०५/०८/२००९ रोजीच्या आदेशांच्या प्रती देखील दाखल केलेल्या आहेत. सदरील आदेशानुसार रिट याचीका क्र.६८०१/२००८ प्रलंबीत असतांना नि.दि.दा.क्र.०७/२००७ (नविन दावा क्र. ६९/२००८) यास स्थगीती दिलेली आहे.

७. प्रस्तुत प्रकरणातील उपरोक्त रिट याचीका ही अदयापही प्रलंबीत आहे. अशा परिस्थीतीत अर्जदाराने त्याबाबत केलेली कथने सुसंगत वाटतात. तथापि, प्रस्तुतचा दिवाणी दावा हा दिनांक २८/०४/२०११ रोजी खारीज करण्यात आला आणि तो फैलावर घेण्याकरीता तब्बल १३ वर्षे ४ महिने २१ दिवसांचा विलंब झालेला आहे. निश्चीतच, वादी या नात्याने प्रस्तुत अर्जदारास सदरील दाव्यामध्ये नियमीत हजर राहुन कार्यवाही करणे अपेक्षीत होते. तथापि, त्याने तशी कार्यवाही न केल्याने दावा काढुन टाकण्यात आला होता. त्याचप्रमाणे प्रस्तुतचा विलंब नेमका कुठल्या कारणाने झाला याबाबत देखील स्पष्टीकरण अर्जदाराने दिलेले नाही. अर्जदाराचे कथन बघता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरत असला तरीही त्याकरिता झालेल्या दिर्घ विलंबाबाबत त्यास कॉस्ट लादणे अत्यावशक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**–आदेश–**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदारावर रक्कम रुपये ५०००/– कॉस्ट लादुन मंजूर करणेत येतो.

२. अर्जदाराने वरीलप्रमाणे कॉस्टची रक्कम गैरअर्जदारास द्यावी. त्याबाबत पुर्तता केल्यानंतर नि.दि.दा.क्र. ६९/२००८ फैलावर घेण्याकरीता झालेला विलंब क्षमापित करण्यात येतो.

३. उपरोक्त दावा फैलावर घेण्याकरीता दाखल करण्यात आलेल्या अर्जास अर्जदाराने वरीलप्रमाणे पुर्तता केल्यानंतर नोंदणीकृत करुन त्यामध्ये गैरअर्जदारांना पुन्हा नोटीस काढण्यात यावी.

४. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

(खुल्या न्यायालयात पारीत व घोषित .)

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2026.07.10 17:52:51 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

मंठा ( रविंद्र म. भेंडे )

दिनांक १०.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मंठा, जिल्हा– जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

याद्वारे मी असे प्रतिपादन करते की, वरील न्यायनिर्णय व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकूर मूळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

न्यायनिर्णयाचा दिनांक – १०.०७.२०२६.

स्वाक्षांकित दिनांक – १०.०७.२०२६.

लघुलेखकाचे नाव – एस. एस. खंडारे (लघुलेखक ग्रेड ३)

न्यायनिर्णय अपलोड
केल्याचा दिनांक – १०.०७.२०२६.